# देशी वानाच्या प्रोत्साहनासाठी कार्यशाळा

## बजाज फाउंडेशनचे आयोजन : शेतकऱ्यांत जनजागृती करण्यासाठी प्रयत्न

**सकाळ वृत्तसेवा**

वर्धा, ता. ३: दिवसेंदिवस बियाण्यांच्या किमता वाढत आहे. शिवाय बियाण्यांवर कीडीचा प्रादुर्भावही वाढत आहे. यामुळे देशी बियाण्यांच्या वाणांना प्रोत्साहन देण्यासाठी बजाज फाऊंडेशन, बजाज समुहाच्या वतीने 'शेतकरी मेळाव्या'चे आयोजन केले होते. देशी बियाणांच्या वाणांना प्रोत्साहन देणे आणि बियांची निवड, उपचार याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे आयोजन होते.

जिल्ह्यात बियाणे पुरेशा प्रमाणात आणण्यासाठी मेळाव्याने शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास प्रोत्साहित केले.बजाज फाऊंडेशनचे विश्वस्त अपूर्व बजाज यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी या कार्यशाळेचे प्रवीण मुळे, जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड आणि आत्माच्या प्रकल्प संचालक विद्या मानकर, बजाज फाऊंडेशनचे हरिभाई मोरी, यांच्यासह अनेकांनी सेंद्रीय शेती विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. रासायनिक शेतीतून होणारे दुष्परिणाम व सेंदीय शेतीचे फायदे, व यावेळी विषद करण्यात आले. शेतकऱ्यांनीही याला सकारात्मक प्रतिसाद दिला.

### १०० हून अधिक शेतकरी सहभागी

या कार्यशाळेत १०० हून अधिक शेतकरी सहभागी झाले होते. असंख्य देशी बियाण्यांच्या प्रदर्शनात, कार्यशाळेने उपस्थितांना नैसर्गिक शेती पद्धतींद्वारे लागवड करता येणाऱ्या विविध प्रकारच्या पिकांबद्दल माहिती जाणून घेण्याची दूर्मिळ संधी उपलब्ध करून दिली. अधिक जागरुकता वाढवण्याच्या उद्देशाने, स्थानिक कृषी महाविद्यालये आणि व्यावसायिक शाळांमधील विद्यार्थ्यांनाही दिवसभर चालणाऱ्या कार्यशाळेसाठी आमंत्रित करण्यात आले होते.



वर्धा : कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना आत्माच्या विद्या मानकर व अन्य